MHAU100008872022

## <u>नि. दि. दा. क्र.१३४/२०२२ मधील नि.क्र.०५ खालील आदेश</u>

*(कैलास जाधव विरुद्ध कारभारी जाधव)*

०१. प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दावामिळकत म्हणजेच सुलीभंजन, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील गट क्र.१५५ मधील एकुण ३०० हेक्टर २२ आर पैकी ४० आर क्षेत्र, जे दाव्याचे परिच्छेद क्रमांक १ मध्ये विशीष्टपणे नमुद आहे, च्या ताब्यास प्रतिवादीने हरकत अडथळा निर्माण करुन नये याकरिता तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२. उलटपक्षी प्रतिवादीने त्याचे म्हणणे निशाणी क्र. ११ वर दाखल केले व प्रस्तुत दाव्यातील मजकुर नाकारतांना दावा मिळकत शासनाकडुन त्याला मिळाल्याचे, तसेच वादीचा दावा मिळकतीतील ताबा नसल्याचे, तसेच वादी विसंबुन असलेले तथाकथित वाटणीपत्र हे बेकायदेशीर आहे असे कथन केले आहे.

०३. वादीतर्फे वकील श्री. डी. पी. काळे व प्रतिवादीतर्फे वकील श्री. नरेंद्र धिवर यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रतिवादीने दाखल केलेल्या निशाणी क्र. १४ वरील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

०४. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | काय वादी तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत ? | नाही. |
| २. | काय हुकूम ? | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्रमांक १ व २ करिताः–

०५. तूर्तातूत मनाई हुकूमाच्या अर्जाचा विचार करतेवेळी वादीला सकृतदर्शी केस आहे काय, न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुने आहे, तसेच अर्ज मंजुर केल्यास नुकसान कोणाचे होईल या बाबी पाहाव्या लागतात.

०६. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने कथन केले की, दावा मिळकत ही त्याचे व प्रतिवादीचे वडील पुर्वीपासुन अतिक्रमण करुन कसत होते व मध्यंतरी सन १९९२–१९९३ मध्ये शासनाच्या ''कसेल त्याची जमीन'' या योजने अंतर्गत वादी व प्रतिवादीचे वडीलांचे नावे दावा गट क्र.५५ मधील ८० आर क्षेत्राकरिता लावण्याकरिता कारवाई करण्यात आली व कुटूंबातील सर्वांच्या संमतीने वाद मिळकत ही घरातील कर्ता पुरुष म्हणुन प्रतिवादीच्या नावे लावण्यात आली व त्यानुसार प्रतिवादीचे नाव सदर मिळकतीच्या महसुल दप्तरी फेरफार नोंद क्रमांक ५३१ अन्वये घेण्यात आली. वादीने पुढे असे कथन केले की, प्रतिवादीने दिनांक १८/०८/२०१० रोजी सदर ८० आर क्षेत्रांपैकी ४० आर क्षेत्र म्हणजेच दावा मिळकतीचे वाटणी पत्रक करुन त्याच्या हिस्सामध्ये वाटुन दिली व त्याप्रमाणे वादी हा दावा मिळकतीचा

मालक व ताबेदार म्हणुन उपभोग घेत आहे. परंतु प्रतिवादी हा त्याचे ताब्यास हरकत व अडथळा निर्माण करत आहे.

**०७.** उलटपक्षी, प्रतिवादीने वादीचे म्हणणे नाकारले व दावा गट क्र.५५ मधील ८० आर क्षेत्र हे त्याचे स्वकष्टार्जीत मिळकत असल्याचे तसेच तथाकथित वाटणीपत्र हे नोंदणीकृत नसल्याचे व ते बेकायदेशीर असल्यामुळे वादीचा दावा मिळकतीमध्ये हक्क ग्राह्य धरण्यासाठी वाचण्या योग्य नाही असे कथन केले.

**०८.** प्रस्तुत दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे भाऊ असल्याबाबत वाद नाहीत. तसेच दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्र हे मुळचे शासनाचे व शासनाने अतिक्रमण नियमीत केल्याबाबत फेरफार नोंद क्र. ५३१ अन्वये दिनांक २०/०३/१९९३ रोजी प्रतिवादीच्या नावे झाल्यामुळे सुध्दा वाद नाही. तसेच वादीने स्वतः निशाणी क्र. ३ वरील दस्त यादीसोबत अ.क्र. २ ला फेरफार नोंद क्र. ५३१ ची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर फेरफार नोंदीला महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमाचे कलम १५७ अन्वये सदर नोंदीला गृहीतक आहे. निश्चतीतच सदर गृहीतक हे खोडुन काढण्या योग्य आहे. पंरतु सध्या स्थितीत त्याबाबत अभिलेखावर कुठलाही पुरावा दाखल नाही. सदर फेरफार नोंदी अन्वये दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्र हे प्रतिवादीला त्याने अतिक्रमण केल्यामुळे व शासनाने ते नियमीत केल्यामुळे प्रतिवादीला दिल्याचे स्पष्ट होत आहे. सदर फेरफार नोंदीमध्ये सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादीच्या वडीलांनी अतिक्रमण केले होते व त्यांचे वडीलांचे

अतिक्रमण नियमीत केले याबाबत काही उल्लेख नाही. त्यामुळे सदर फेरफार नोंदीच्या अवलोकनावरुन शासनाने दावा मिळकतीवरील प्रतिवादीचेच अतिक्रमण नियमीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. या व्यतिरीकत, प्रतिवादीने निशाणी क्र. १३ वरील दस्त यादीसोबत तहसीलदार खुलताबाद यांनी सदर जमीनीवरील अतिक्रमण काढण्यासाठी दिलेले दिनांक १६/०९/१९८७ ची नोटीसची छायांकित प्रत दाखल केली. सदर नोटीस मधील मजकुराप्रमाणे शासनाने अतिक्रमण नियमीत करण्यापुर्वी प्रतिवादीलाच अतिक्रमाणासंदर्भात नोटीस दिल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येत आहे.

**०९.** उलटपक्षी, प्रतिवादीने सदर मिळकतीवरील अतिक्रमण हे त्याचे व प्रतिवादीचे वडील गणपत यांचे असल्याचे दाखवण्याकरिता निशाणी क्र. १६ वरील दस्त यादीसोबत तहसील कार्यालय खुलताबाद यांच्यासमक्ष चालेल्या संचिका क्रमांक : फाईल क्र.८४/जमाबंदी/शका वि३८१ दिनांक २९/१०/१९८४ मधील काही कागदपत्रांच्या छायांकित प्रति अभिलेखावर दाखल केल्या आहेत. पंरतु सदर कागदपत्राच्या अवलोकनावरुन सदर कागदपत्र हे सर्वे क्र. ५० क्षेत्रामधील ५ एकर या गायरान जमीनीबद्दल असल्याचे दिसुन येत आहे. सदर सर्वे क्र. ५० व त्यामधील ५ एकर क्षेत्राचा दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्रासोबत संबंध आहे हे दाखवण्यासाठी कुठलाही प्रथदर्शनीय पुरावा नाही. त्यामुळे सदर कागदपत्र हे दावा गट क्र. ५५ संबंधीचे आहे हे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. सबब, उपरोक्त चर्चेवरुन शासनाने दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्रावर प्रतिवादीचे अतिक्रमण असल्याचे व तेच सन १९९३ मध्ये शासनाने नियमीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते आहे.

त्यामुळे दावा मिळकत ही प्रथमदर्शनीय वादी व प्रतिवादी यांची संयुक्त कुटूंबाची किंवा वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे दिसुन येत नाही.

**१०.** वादीने सदर दाव्यामध्ये पुढे असे कथन केले की, सदर वाद गट क्र. ५५ मधील ४० आर क्षेत्र म्हणजेच दावा मिळकत ही प्रतिवादीने दिनांक १८/०८/२०१० रोजी वाटणी पत्राद्वारे त्याचे हिस्यामध्ये वाटुन दिली व तेंव्हपासुन तो दावा मिळकतीचा उपभोग घेत आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने वादीने निशाणी क्र. ३ वरील दस्त यादीसोबत अ.क्र. ३ ला दिनांक १८/०८/२०१० रोजीचे तथाकथित वाटणी पत्रकाची छायांकित प्रत दाखल केली. सदर तथाकथित वाटणी पत्रामध्ये दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्रांपैकी पुर्वेकडील ४० आर क्षेत्राचा भाग हा वादीला व पश्चिमेकडील भाग प्रतिवादीला दिल्याचे कथन आहे. पंरतु सदर वाटणीपत्र हे नोंदणीकृत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***श्याम नारायण प्रसाद विरुद्ध कृष्णा प्रसाद*** (2018 SAR (Civil 895) या निवाडयातील निकषाप्रमाणे जर पक्षकांरामध्ये लेखी वाटणीपत्र होत असेल व वाटणीपत्राप्रमाणे पक्षकारांचे वाटणी पत्रामध्ये नमुद मिळकतीमध्ये विशीष्ट क्षेत्रावर हक्क निर्माण होत असतील तर सदर वाटणी पत्र हे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्यातील तथाकथित वाटणी पत्रामध्ये सुध्दा दावा गट क्र. ५५ मधील ८० आर क्षेत्रांपैकी विशीष्ट क्षेत्रावर वादीचा व विशीष्ट क्षेत्रावर प्रतिवादीचा हक्क निर्माण होत असल्याबाबत मजकुर आहे. त्यामुळे सदर वाटणी पत्र हे नोंदणीकृत असणे आवश्यक होते, त्याशिवाय सदर वाटणी पत्र हे दावा मिळकतीमध्ये हक्क निर्माण करण्यासाठी पुराव्यात घेणे शक्य नाही.

**११.** सबब, उपरोक्त चर्चेवरुन दावा मिळकत ही प्रथमदर्शनीय वादी व प्रतिवादी यांची संयुक्त कुटूंबाची किंवा वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे दिसुन येत नाही. तसेच तथाकथित वाटणीपत्रामध्ये सुध्दा वादीचा दावा मिळकतीमध्ये हक्क किंवा ताबा सांगण्यासाठी उपयुक्त नाही. त्यामुळे वादीच्या हितामध्ये प्रथमदर्शनीय केस दिसुन येत नाही. त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे गृहीत धरणे शक्य नाही. त्यामुळे न्यायाचे तौलानिक तराजु सुध्दा वादीच्या बाजुला झुकतांना दिसुन येत नाही. त्यामुळे वादीने मागितलेला अनुतोष मिळण्यास वादी पात्र नाही. परिणामी मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नाही असा नोंदवित असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **–:: आदेश ::–**

**०१** वादीचा अर्ज निशाणी क्र. ५ नामंजूर करण्यात येत आहे.

**०२.** खर्चाचा हुकूम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल

स्वाक्षरीत/–

**दिनांकः– ०६/०३/२०२४**

**(व्ही. एच. खेडकर)**

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

खुलताबाद

*नि.दि.दा. क्र. १३४/२०२२*

***नि.क्र. ०५ खाली आदेश***

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्रातील/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | ***आकाश एस. चव्हाण (लघुलेखक ग्रेड-३)*** |
| न्यायालयाचे नाव | :- | दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), खुलताबाद |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०६/०३/२०२४ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर/ आदेशावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | :- | ०६/०३/२०२४ |
| निकलापत्र/आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/०३/२०२४ |